**BDC LIBRARY**
**New Paper Clipping**
**A.Y. 2023-2024**

# संविधान दिन उत्साहात साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

पाटण : येथील बीडीसी पाटण आयक्यूएससी व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने २६ नोव्हेंबर भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी तळमावले येथील काकासाहेब महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागातील प्रा. ए. ए. पवार यांनी संविधानाची गरज आणि महत्त्व सांगितले. त्याचे वाचन केले.

यावेळी प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, प्रा. डॉ. हेमलता काटे, परीक्षा विभाग प्रमुख प्रा. डी. डी. थोरात, प्रा. दीपाली किरतावडे विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी संविधान म्हणजे काय, राज्यघटना म्हणजे काय यांची माहिती विद्यार्थ्यांना करून दिली. त्यानंतर हेमलता काटे यांनी विद्यार्थ्यांना योग्य असे मार्गदर्शन केले. प्रा. रुकय्या शेख यांनी आभार मानले.

यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्ये उपस्थित होते.